**<u>ठळक बातम्या</u>**

- महापालिका निवडणुकांचा प्रचार आज संपणार, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची निवडणूक आज जाहीर होणार

- ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्य दलांनी निर्धारित ९ पैकी ७ लक्ष्य नष्ट केल्याची लष्कर प्रमुखांची माहिती

- गेल्यावर्षी देशभरातून ४ लाख कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची निर्यात, दुर्मिळ खनिजांवरच्या अमेरिकेतल्या बैठकीत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचा सहभाग

**आणि**

- नवी दिल्लीत होणाऱ्या आगामी ब्रिक्स शिखर परिषदेचं मानचिन्ह, संकल्पना आणि संकेतस्थळाचं परराष्ट्र मंत्र्यांच्या हस्ते अनावरण

**<><><><><>**

राज्यातल्या महापालिका निवडणुकांसाठीच्या प्रचाराच्या तोफा आज संध्याकाळी साडेपाच वाजता थंडावतील. राज्यातल्या २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या २ हजार ८६९ नगरसेवकांसाठी परवा मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहे. सकाळी साडे ७ ते साडे ५ वाजेदरम्यान हे मतदान होणार आहे.

प्रचाराचा अखेरचा दिवस असल्यानं सर्व राजकीय पक्षांनी प्रचारावर लक्ष केंद्रीत केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपुरात रोड शो घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत रोड शो केला तर अजित पवार पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये रोड शो करत आहेत. राज ठाकरे यांनीही आज पुण्यात प्रचार केला.

**<><><><><>**

राज्यातल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीची घोषणा आज होणार आहे. आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषद आणि सव्वाशे पंचायत समित्यांमध्ये या निवडणुका होण्याची शक्यता आहे. मुंबईत संध्याकाळी ४

वाजता राज्य निवडणूक आयोग वार्ताहर परिषद घेऊन या निवडणुकांची घोषणा करणार आहे. सर्वोच्च न्यायालयानं कालच या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करायला १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढ दिली होती.

<><><><>

ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतीय सैन्य दलांनी पाकिस्तानमधली नऊपैकी सात लक्ष्यं नष्ट करून चोख प्रत्युत्तर दिल्याचं प्रतिपादन लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेला संबोधित करत होते. ऑपरेशन सिंदूर हे तिन्ही सैन्य दलांच्या समन्वयाचं उत्तम उदाहरण आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर निर्णायक प्रत्युत्तर देण्याचा निर्णय सर्वोच्च पातळीवर घेण्यात आला होता, असं त्यांनी सांगितलं.

गेल्या १० मे पासून जम्मू आणि काश्मीर आणि पश्चिमी सीमेवरची परिस्थिती संवेदनशील असली तरी ती पूर्णपणे नियंत्रणात आहे. गेल्यावर्षी ३१ दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आलं, त्यापैकी ६५ टक्के दहशतवादी पाकिस्तानचे होते, अशी माहितीही द्विवेदी यांनी दिली.

<><><><>

जर्मनीचे चान्सलर फ्रेडेरिक मर्ज आज बेंगळुरूला पोहोचले. कर्नाटकचे उद्योगमंत्री एम. बी. पाटील यांनी विमानतळावर त्यांचं स्वागत केलं. या भेटीदरम्यान ते बॉश या जर्मन कंपनीच्या भारतातल्या मुख्यालयाला, तसंच भारतीय विज्ञान संस्थेतल्या नॅनो विज्ञान आणि अभियांत्रिकी केंद्राला भेट देणार आहेत.

<><><><>

२०२५ या वर्षात देशातून ४ लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची निर्यात झाली आहे. देशातल्या ४ सेमीकंडक्टर प्रकल्पातून यावर्षी उत्पादन सुरू झाल्यावर ही निर्यात आणखी वाढेल, असं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमांमध्ये ही माहिती दिली. या निर्यातीत सर्वाधिक वाटा मोबाइलचा आहे. सुमारे २५ लाख जण या उद्योगात कार्यरत आहेत.

<><><><>

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आज अमेरिकेत वॉशिंग्टन डीसी इथं अर्थमंत्री स्कॉट बेसेन्ट यांनी आयोजित केलेल्या दुर्मिळ खनिजविषयक बैठकीत सहभागी झाले. या बैठकीत ऑस्ट्रेलिया, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, मेक्सिको, दक्षिण कोरिया आणि ब्रिटनचे अर्थमंत्री, तसेच अमेरिकेचे व्यापार आणि वित्त अधिकारी सहभागी झाले होते. खनिजांवर आधारित उत्पादन क्षेत्रं वेगाने वाढत असल्यामुळे भारतासारख्या देशांसाठी ही बैठक महत्त्वाची असल्याचं अश्विनी वैष्णव म्हणाले.

मातीतले दुर्मिळ घटक तसंच महत्त्वाच्या खनिजांची जागतिक पुरवठा साखळी मजबूत करण्यावर बैठकीत चर्चा झाली. खनिजांच्या शुद्धिकरणासाठी वापरलं जाणारं तंत्रज्ञान, नवीन प्रकल्पांना निधी पुरवठा करणं, तंत्रज्ञान सामायिक करणं, कचऱ्यातून खनिजं मिळवणं तसंच संशोधनात परस्पर सहकार्याविषयी या बैठकीत चर्चा करण्यात आली.

<><><><><>

उत्पादन आधारित प्रोत्साहन योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत १३ लाख ६१ हजार इलेक्ट्रीक वाहनांना आर्थिक मदत पुरवल्याची माहिती केंद्र सरकारनं दिली आहे. इलेक्ट्रिक तसंच हायड्रोजन आधारित वाहनांच्या किंमतीवर १३ ते १८ टक्के आणि इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर चालणाऱ्या वाहनांच्या सुट्या भागांवर ८ ते १३ टक्के सवलत केंद्रीय अवजड उद्योग मंत्रालयाकडून दिली जाते. १० लाखांहून अधिक दुचाकी, २ लाखांहून अधिक तीन चाकी, ८० हजार चार चाकी आणि १ हजार ४०० इलेक्ट्रिक बसना २०२१ पासून या सवलतींचा लाभ मिळाला आहे.

<><><><><>

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज नवी दिल्ली इथं होणाऱ्या आगामी ब्रिक्स शिखर परिषदेसाठी मानचिन्ह, संकल्पना आणि संकेतस्थळाचं अनावरण केलं. या शिखर परिषदेदरम्यान भारत व्यापक जागतिक कल्याणासाठी ब्रिक्स देशांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करणार आहे. ब्रिक्स यंदा २० वर्षं पूर्ण करत असून या काळात उदयोन्मुख बाजारपेठा, विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये सहकार्यासाठी एक महत्त्वाचं व्यासपीठ म्हणून सातत्याने विकसित होत आहे, अशी प्रतिक्रिया डॉ.जयशंकर यांनी माध्यमांना दिली.

<><><><><>

भ्रष्टाचाराच्या प्रकरणात सरकारी कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यापूर्वी परवानगीची अट बंधनकारक असल्याच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या २ सदस्यीय खंडपीठात एकमत होऊ शकलेलं नाही. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याचं १७ ए हे कलम असंवैधानिक असून ते रद्द करण्याची गरज न्यायमूर्ती बी व्ही नागरत्ना यांनी व्यक्त केली. तर इमानदार अधिकाऱ्यांचं रक्षण करण्यासाठी हे कलम गरजेचं असल्याचं मत न्यायमूर्ती के व्ही विश्वनाथन यांनी नोंदवलं. २०१८ मध्ये हे कलम आणण्यात आलं होतं. त्याला विरोध करणारी याचिका एका स्वयंसेवी संस्थेनं दाखल केली होती. आता सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत मोठ्या खंडपीठाची नियुक्ती करतील आणि त्यासमोर याप्रकरणी पुन्हा सुनावणी होईल.

<><><><><>

हिमाचल प्रदेशमध्ये सोलन जिल्ह्यात काल काही दुकानांना आग लागल्यानं झालेल्या दुर्घटनेत चार कामगारांचा मृत्यू झाला तर पाच जण बेपत्ता आहेत. आर्की इथल्या जुन्या बस स्थानकाजवळ ही दुर्घटना घडली. आग लागल्यानं दुकानाचा काही भाग कोसळून त्या ढिगाऱ्याखाली पाच कामगार अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. हे सर्व कामगार नेपाळचे रहिवासी आहेत.

<><><><><>

सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेल्या पिकांच्या आनंदाप्रीत्यर्थ देशात सर्वत्र आज उत्सव साजरा केला जात आहे. महाराष्ट्रात आज भोगीचा उत्साह आहे; तर उद्या संक्रांतीचा सण साजरा होणार आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातही आज शेकोटी पेटवून, गाणी गात, पारंपरिक पदार्थांचा आस्वाद घेत लोहडीचा सण साजरा केला जातो.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना लोहडी, मकर संक्रांत, बिहू आणि पोंगलच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण देशाच्या समृद्ध कृषी परंपरांचे प्रतीक आहेत आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रतिबिंबित करतात, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

इराणशी व्यापार सुरू ठेवणाऱ्या देशांच्या अमेरिकेबरोबरच्या व्यापारावर अतिरिक्त २५ टक्के कर लादायची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. हा अतिरिक्त कर तत्काळ लागू होईल, असं ट्रम्प यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं.

लष्करी कारवाई, लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रं, सायबर आणि इतर हल्ल्यांच्या तयारीचा आढावा ट्रम्प यांनी घेतला आहे. इराणनं चर्चेची तयारी दाखवली आहे तरी परस्पर आदर दाखवणाऱ्यांसोबतच चर्चा करणार असल्याचं इराणनं सांगितलं. त्याचवेळी युद्धासाठीही तयार असल्याचं इराणनं स्पष्ट केलं. गेल्या ३ आठवड्यांपासून सुरू असलेल्या इराणमधल्या आंदोलनात आतापर्यंत किमान ६४८ आंदोलक ठार झाल्याची माहिती मानवाधिकार गटांनी दिली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेतून चुकीच्या पद्धतीनं बाहेर काढण्यात आलेल्या भारतीय नागरिकाला परत आणायची प्रक्रिया सुरू करायचे आदेश अमेरिकेतल्या एका न्यायालयानं तिथल्या देशांतरण विभागाला दिले आहेत. या इसमाला भारतात पाठवू नये, असे स्पष्ट निर्देश न्यायालयानं दिले असतानाही त्याची रवानगी करणं हे बेकायदा आणि न्यायालयाच्या अधिकारांचं उल्लंघन आहे, असा निकाल न्यायाधीशांनी दिला.

**<><><><><>**

बांग्लादेशात रविवारी रात्री आणखी एका अल्पसंख्यकाची हत्या झाली. फेनी जिल्ह्यात डगनभुईयानमध्ये ही व्यक्ती रिक्षाचालक होती आणि मारेकरी हत्येनंतर त्याची रिक्षा घेऊन फरार झाले.

**<><><><><>**

सर्व राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरणांनी आंतरराष्ट्रीय संबंध आणि क्रीडा क्षेत्रातल्या मेक इन इंडिया संदर्भात समित्यांची स्थापना करावी असा सल्ला सरकारनं दिला आहे. यामुळं जागतिक पातळीवर क्रीडा क्षेत्रात भारताची ओळख बळकट होईल तसंच देशातल्या क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिल्यानं आत्मनिर्भर भारताला बळ मिळेल, असं केंद्रीय क्रीडा आणि युवा कल्याण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात जायंट्सबरोबर होणार आहे. नवी मुंबईच्या डी. वाय. मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

काल झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनं यूपी वॉरियर्सवर ९ खेळाडू राखून मात केली. १४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बेंगळुरूच्या संघानं एक खेळाडू गमावून १२ षटकं आणि एका चेंडूतच १४५ धावा फटकावल्या. ग्रेस हॅरिस हिला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

//<><><><><>//